
गोष्टीतून संस्कार
मीनाक्षी सरदेसाई
परी प्रकाशन

**गोष्टीतून संस्कार**

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.


**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत :**
रुपये १४०/-

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | खाडीवरचा होडीवाला | ३ |
| २. | फोनाफोनी आणि उपद्व्याप | १० |
| ३. | आरसा | १६ |
| ४. | कथा एका बालवीराची | १९ |
| ५. | अति तेथे माती | २२ |
| ६. | नाचता येईना अंगण वाकडे | २७ |
| ७. | ससोबाची चांदोबॉलची सफर | ३१ |
| ८. | 'महान' व्हायला जाताना... | ३६ |
| ९. | पाण्यासाठी किल्ला – एक मुलाखत | ४६ |
| १०. | हे मातृभूमी | ५२ |
| ११. | आईला सुट्टी देऊया | ५५ |
| १२. | मंगी आणि तिची आई | ६६ |
| १३. | चिनू कशी बदलली? | ७५ |
| १४. | चूक कबूल आहे | ८५ |
| १५. | राक्षसाएवढा उंदीर | ९१ |
| १६. | सत्यमेव जयते! | ९५ |
| १७. | जंगलातलं घर | १०९ |
| १८. | वेदाची बाहुली | ११४ |
| १९. | एक अशीही शिक्षा | १२२ |
| २०. | चूक समजली ना बाळ? | १२८ |
| २१. | बिन्नीचं शिक्षण | १३३ |
| २२. | खेळातली बंदूक आणि संतोष | १४२ |
| २३. | आजीने सांगितलेली गोष्ट | १४८ |
| २४. | बुजगावणं – तिसरा पार्टनर | १५३ |
| २५. | 'पांढऱ्या-काळ्या'ची धमाल | १६३ |
| २६. | 'शायर' कुत्र्याच्या थापा | १६९ |
| २७. | गुलाबजाम | १७३ |
| २८. | मैत्री | १७६ |
| २९. | खेळण्याचं घर नि पोलीस बाहुला! | १८७ |



# खाडीवरचा होडीवाला

आपल्या भारत देशाची पश्चिम बाजू म्हणजे समुद्रकिनारा आहे. अरबी समुद्र म्हणतो आपण त्याला ! समुद्राला भरती–ओहोटी असते. चंद्राच्या कलेप्रमाणे, म्हणजे त्याच्या दर्शनाने समुद्राचं पाणी उसळत असतं जणू काही चंद्राला बघून पाण्याला आनंद वाटतो. त्यावेळी समुद्राचं पाणी किनाऱ्यावर पुढेपर्यंत येतं. ओहोटीच्या वेळी पाणी पुन्हा समुद्राच्या पोटात जातं. तेव्हा किनारा कोरडा होतो.

समुद्राच्या हालचालींची ही मजा नावाडी लोकांना छान माहीत असते. वादळवारा आला की हाच समुद्र खवळतो, संतापतो, लाल होतो. काहीवेळा नावाड्यांच्या होड्या उलटतात. पण नावाडी पट्टीचे पोहणारे असतात. ते शूर असतात. समुद्राच्या रुद्रावताराला ते भीत नाहीत.

समुद्राला फाटे फुटतात. त्यातून पाणी वाहतं, ते नदीसारखं दिसतं. पण ते पाणी खारं असतं. त्या फाट्यालाच खाडी म्हणतात. अशाच एका खाडीवरचं एक चिमुकलं गाव. नारळाच्या झिपऱ्या झावळ्यांमध्ये ते लपलेलं होतं. गरीब–गुरीब माणसं तिथे राहायची. पोटासाठी राबायची. झाडापेडांची फळं म्हणजे आंबे, फणस, रातांबे, चिंचा, आवळे यांच्यावर त्यांचा खर्च भागायचा.

खाडीतून होड्या फिरायच्या. लोक होडीतून शहरात जायचे. बाजार करायचे. गावाला जायचं म्हणजे आधी होडीने जवळच्या शहरात जायचं. मग तिथे एस.ट्या. मिळायच्या. नावाडी होड्यातूनच प्रवाशांना पोचवायचे. त्यांना त्याचे पैसे मिळायचे.

मी गोष्ट सांगणार आहे एका छोट्या नावाड्याची. त्याचं नाव आहे रहमान. रहमान आठवीत होता. त्या दिवशी रहमानला शाळेत जायला फारच उशीर झाला. सर म्हणाले, ''इतका उशीर? शाळा आहे की धर्मशाळा? उशीर का? अभ्यास पण नसशीलच केलेला !''

''होडी घेऊन गेलो हुतो.'' रहमान भीत भीत म्हणाला. त्याची मान खाली होती. डोळे पाण्याने भरलेले ! ''मग तेच कर रे ! इकडे शाळेकडे येतोसच कशाला? आम्ही काय तुला बोलावतो का?'' सर रागाने म्हणाले.

असं नेहमीच व्हायचं. पण रहमानचा इलाज नव्हता. त्याचं शाळेतल्या इतर मुलांसारखं नव्हतं.

रहमान महंमदचा मुलगा. महंमद हा नावाडी होता. त्याचं एक होडकुल होतं. होडकुल म्हणजे छोटी होडी. महंमदने कर्ज काढलं. आंब्याचं झाड विकत घेतलं. सुताराकडून होडी बनवून घेतली. पूर्वी तो फक्त मासेमारी करायचा. पण हल्ली खाडीतले मासे मरत होते. महंमदचा संसार मासेमारीवर चालेना म्हणून त्याने होडीचा धंदा सुरू केला. होडीने तो प्रवाशांची ने-आण करायचा. खाडीकाठच्या गावाचं नाव होतं कोळंगाव. तिथून चार-पाच मैलावर होतं खोरेटन. कोळंगावपेक्षा खोरेटन शहर होतं. तिथे बाजार भरायचा. एस.ट्या. यायच्या. सडका होत्या. पाण्याचे नळ होते. कोळंगावच्या लोकांना वाटायचं, खोरेटन केवढं शहर !

मुंबईहून येणारे प्रवासी खोरेटनला उतरायचे. तिथून होडीने त्यांना खाडीवरच्या गावांना यावं लागे. ते चाकरमानी असत. त्यांना चांगला पगार मिळे. मुंबईच्या टॅक्सी-बसपेक्षा महंमदची होडी त्यांना स्वस्त वाटे. महंमदला ते आनंदाने भाडं देत. बक्षिसीही देत. काही माणसं मात्र कवडीचुंबक ! घासाघीस करत कमी पैसे द्यायला बघत.

रहमान बाबांना होडीच्या धंद्यात मदत करी. नुसतंच शिकणं त्यांना परवडणार कसं? काम हे करायलाच हवं. पैसे मिळवायलाच हवेत. गरिबांच्या घरी लहान मुलांनासुद्धा पैसे मिळवावेच लागतात नाही का?

रहमानची शाळा अकराची. पहाटे तो आपल्या बाबांबरोबर होडीवर जायचा. मधून मधून वल्ही मारायचा. काठी रोवायचा. काठी खोल रोवली की त्या जोरावर होडी पुढे जाते. होडी कशी चालवायची हे रहमानला हळूहळू कळायला लागलं. वल्ही मारून त्याचे दंड पिळदार झाले होते.

मुंबई गाडी पकडायची म्हणजे माणसांना पहाटे होडी लागायची. रहमान बाबांबरोबर जायचा, होडी वल्हवायचा. अकरा, साडे-अकराला शाळेत हजर व्हायचा. त्याचे कपडे खाऱ्या पाण्याने



भिजलेले असायचे. खारा वास वर्गभर दरवळायचा. त्याच्या बाकावरचा शेजारचा मुलगा उठायचा. दुसरीकडे जाऊन बसायचा. रहमानला हे सगळं कळायचं, पण काय करणार? शाळा पण बुडता नये. होडी चालवायलाही जायला हवे.

एके दिवशी बाका प्रसंग आला. बाप-लेक दोघेही होडी घेऊन शहरात गेले. अचानक महंमदला हुडहुडी भरली. दुसऱ्याच्या होडीतून तो घरी आला. येताना त्याने रहमानला बजावलं, ''जलदी वापस आओ, कोई बम्बईवाला पॅसेंजर आया तो ला उसको!'' महंमद खोकत खोकत घरी आला. रहमानची आई मनातून फार घाबरली होती. नवऱ्यासमोर बोलली नाही; पण तिला वाटत राहिलं, ''रातमें मुसीबत हो तो बेटा अकेला क्या करेगा? कितना छोटा है.'' तिचा जीव थोडा थोडा होत राहिला.

इकडे रहमान मात्र फार फुशारला होता. तो आज एकटा स्वतंत्रपणे भाडं करणार होता. तो मोटार स्टँडवर जाऊन बसला. मुंबईची गाडी आली. ती गाडी गोव्याला जाणारी होती. एक चाकरमानी खाली उतरला. बरोबर त्याची बायको नि दोन मुलं होती. त्यांची नजर इकडे-तिकडे भिरभिरत होती.

''तुमका खाली खाड्येत जावचा ह मां? होडी असा माजी चला. मी न्हेतंय्.'' रहमान तिथे जाऊन म्हणाला, ''तू एवढासा मुलगा होडी चालवतोस? काय घेणार?'' चाकरमानाने विचारलं.

''आता काय घ्येनार? दर हाय त्योच मी बी घ्येनार. तुमच्याकडना काय जास्ती घ्येवचो नाय.''

''पण किती? तुमचा इथला दर आम्हाला काय माहिती? आम्ही पाच वर्षांनी गावाला येतोय.''

''खय गावचा? पोंबुर्ल्याक? गोकल्यांकडे? घ्या इतका सामान हा. चार मानसा वीस रुपये होतीत.''

''वीस रुपये? मोटार की विमान रे? होडी तर आहे साधी. पेट्रोल घालायला नको की डिझेल नको.''

''पन जोर लावुक लागता चाकरमान्यानू!'' रहमान मोठ्या माणसासारखं बोलत होता. मुलं त्याच्याकडे बघतच राहिली होती. तो माणूस दुसऱ्या होडीवाल्यांना विचारून आला. तोपर्यंत रहमान गप्प राहिला. त्याला माहीत होतं. गिऱ्हाईक पुन्हा आपल्याकडेच येणार आणि तसंच ते आलं. रहमानचा दर सर्वात कमी होता. त्याने मुद्दामच आज दोन रुपये कमी लावले होते. त्याला रिकामं जायचं नव्हतं.

पॅसेंजर त्याच्याजवळ आला, ''हं, उचल सामान.'' तो रहमानला म्हणाला. त्याच्या बायकोला दया आली. ती नवऱ्याला म्हणाली, ''अहो, आपलं सामान बरंच आहे. हे एवढंसं पोर एकटं

कसं न्हेणार होडीपर्यंत? आपण एका हमालाला बोलावू.'' हमालाने सात–आठ बोजे होडीत आणून ठेवले? नसते ठेवले तरी रहमान आणण्याच्या तयारीत होता. नवरा–बायको बसली. मुलाचे हात धरून रहमानने त्यांना बसवलं.

''नीट बसा हां !'' तो मोठ्या होडीवाल्यासारखं सांगत होता. त्याने वल्हं मारलं. होडी हळूहळू निघाली. उशीर फार झाला होता. बराच लांबचा पल्ला गाठायचा होता. रहमानला जास्तीत जास्त जोर लावून पल्ला गाठायचा होता.

''किती सावकाश रे ! अजून वायंगिणीसुद्धा नाय इली.'' पाहुणा नाराजीने म्हणाला. मुलं पेंगायला लागली होती. ''काय करुचा पावण्यानु. ताण उलटा असा, होडी फुल्ल !'' रहमान नम्र आवाजात म्हणाला. त्याला ठाऊक होतं की पॅसेंजर म्हणजे आपले देव. ते रागावले ओरडले तरी आपण उर्मटपणे बोलता कामा नये. त्यांच्यामुळे आपल्याला पैसे मिळतात. त्यांच्यामुळे आपण दोन वेळा जेवतो. होडी नव्हती तेव्हा बाबा मासेमारी करायचा. जाळं टाकून बसायचा. काही वेळा मासे मिळायचे काही वेळा नाही. मिळाले तर, आई–बाबा वाडीत जायचे. दारोदारी हाका मारीत म्हावरं विकायचे. विकलं गेलं नाही तर उपास. मासे कुजायचे. ते वाळवून त्याचं खत करायचं. ते विकायचा प्रयत्न करायचा. खूप दगदग होती त्या सगळ्या प्रकारात. आता होडीमुळे परिस्थिती बदलली. आता दिवसभरात दोन भाडी झाली तर पन्नासभर रुपये रोख मिळतात. म्हणूनच नारळी पौर्णिमेला त्यांच्या घरी त्या होडीची भक्तीभावाने पूजा व्हायची. होडी म्हणजे देवीच. रहमानच्या मनात असे विचार येत होते. रहमान होडी चालवायला गेला की त्याचा अभ्यास होत नसे. मग मार खायचा, सर रागवायचे. त्यांचं नेहमीचं म्हणणं, ''मग होडीच चालव रे. शाळेत यायचं नाटक कशाला? आम्ही तुला बोलवायला नाय आलो.''

रहमानला माहीतच होतं, आपल्याला कोणीही शाळेत 'ये' म्हणणार नाही. आपल्यासारखी अभ्यास बुडवणारी मुलं शाळेला नको असतात. त्यांचा निकाल कमी लागतो. पण होऊ दे काहीही, आपण मात्र शाळा सोडायची नाही, ''धावी तरी पास व्हायचंय.''

होडी फारच संथपणे चाललेली. पाहुण्यांना झोप येत होती. वारा गार सुटलेला होता. दोन्ही मुलं तर आपल्या आईच्या मांडीवर गाढ झोपली होती. आईने त्यांना उबदार पांघरुणं घातली होती. त्यांच्यापेक्षा थोडा मोठा रहमान मात्र त्याच गार वाऱ्यात जिवाच्या कराराने होडी वल्हवत होता.

थोड्या वेळाने होडीतली मुलगी उठली. रडायला लागली. पाण्यात हात घालून पाणी उडवण्याचा खेळ खेळू लागली. दोघा नवरा–बायकोचं घरचं काहीतरी बोलणं सुरू झालं होतं. होडी पुढे जाताना खूपच त्रास व्हायला लागला. तेव्हा मात्र रहमान विचारातून जागा झाला.

''होडी फुडं का जायना रे? हिथेच का घोटाळतोय?'' पाहुणा विचारीत होता. रहमानला तेच वाटत होतं.



होडी कशीबशी कुणकवणपर्यंत आली होती. अजून दोन–तीन मैल जायचं होतं. आकाशातला सूर्याचा लाल लाल गोळा पाण्याला टेकण्यास आला होता. हां हां, म्हणता तो पाण्यात बुडेल. अंधार पडेल. आताच ह्या होडीला काय झालं? रहमानने वल्हं खाली ठेवलं. होडीच्या तळाला पाहिलं. तिथे पाऊलभर पाणी साठलेलं होतं.

'म्हणजे? होडक्यात पानी भरताहा? बापरे !' त्याने एका टोकाचा पत्र्याचा डबा काढला. तो डबा भरून घेऊन तो पाणी ओतू लागला. पाणी सारखं भरतच होतं, कमीच होईना. ''काय झालंय? होडी कुठेतरी फुटली की काय?'' एखादी चीर पडली तरी पाणी आत येत राहतं. हे रहमानला माहीत होतं. पाणी भरतच होतं. सामान तर भरपूर, पॅसेंजर परके. त्यांना होडीतली संकटं माहिती नाहीत. रहमानच्या छातीत धस्स् झालं. होडी पुढे सरकत नव्हती. ती पाण्याने गडगड होत होती. वल्हवून वल्हवून रहमानचे हात भरून आले होते. छाती फुटेल की काय इतका दम लागत होता. भीतीने पोटात खड्डा पडला होता. रात्र तर जवळ जवळ येत चाललेली नि होडी तिथल्या तिथे घुटमळणारी.

''अरे, असं कसं होतंय? होडीत पाणी? असली कसली रे तुझी होडी? फुटली की काय? आता आम्ही करायचं तरी काय?' मुलं, त्यांची आई सगळ्यांची घाबरगुंडी उडाली.

''आपलं चुकलंच, एवढ्याशा लहान मुलाच्या होडीत आपण बसायला नको होतं.'' बाई म्हणत होत्या. ''अगं दुसरे होडीवाले पंचवीस म्हणाले, हा वीस म्हणाला. म्हणून ही होडी घेतली. मला काय ठाऊक !'' पाहुणा चुकचुकत होता.

''पाच रुपये वाचवायला गेलात. आता घ्या.''

रहमान सगळं ऐकत होता. आपल्या होडीमुळे ह्या माणसांवर कोणतं संकट येतंय हे त्याच्या लक्षात आलं. होडीत असंच पाणी साठत राहिलं, नि ते काढलं गेलं नाही तर होडी बुडणार. माणसं, सामान बुडणार. ह्या सायबांना पोहायला येतंय की न्हाई देव जाणे. पोरांना कसं काढणार?

त्यांच्या आईला कोण काढणार? आपल्याला पोहायला येतंय, पण आपण एकटे ह्या सर्वांना किनाऱ्यापर्यंत न्यायला पुरे पडणार का? खाडीला भरती येत चाललेली. तो कोड्यात पडला; पण आपली भीती त्याला पाहुण्यांना दाखवायची नव्हती. खाली उतरावं होडी ढकलावी तर भरपूर पाणी.

रहमान पाणी काढत राहिला, होडी थोडी हलकी झाली की ती थोडी पुढे सरके. पण इतक्या हळू चालीने तीन-चार मैलांचा पल्ला कसा गाठणार?

इतक्यात त्याला एक युक्ती सुचली. उंबराच्या झाडाची एक मोठी फांदी पुढे आली होती. ती हातापर्यंत यायला हवी होती. निदान होडी तिथपर्यंत पोचायला हवी होती. फांदीच्या आधाराने होडीला ढकलायची. ती किनाऱ्याला लागली की झालं. त्याचं पाणी काढण्याचं नि होडी इंच-इंच पुढे नेण्याचं काम चालूच होतं. हात भरून आले होते. तरी पाणी काढायलाच हवे होते.

कशाला आपण भाड्याची आशा ठेवली ! बाबांबरोबर आपण पण जायला हवं होतं घरी ! उलट-सुलट विचारांनी रहमान गोंधळला होता. त्याने धीर मात्र सोडला नाही. त्याने मग संकोच सोडला नि तो पाहुण्यांना म्हणाला,

''काकानु, तुमी जरा डब्यानं पानी काढता काय? मी त्या फांदीक ओहकांबा मारतंय.''

पाहुणा म्हणाला, ''बरं ! पण काय ते नीट कर रे बाबा. पडशील. नि आम्ही सगळीच बुडू.''

पाहुणा पाणी काढू लागला. रहमानने फांदी धरली. होडी त्या धक्क्याने थोडी पुढे सरकली. आता आशा निर्माण झाली. आता आणखी थोडी होडी पुढे सरकायला हवी. मग फांदीला बांधून ठेवता येईल. रहमानचे प्रयत्न चालूच होते.

होडी कणाकणाने पुढे जात होती. किनाऱ्याकडे येत होती. पाय जमिनीला लागतील इतक्या उथळ ठिकाणी ती आली. नि रहमान होडीतून खाली उतरला. त्याने एका टोकाला ठेवलेली मोठी रस्सी काढली. ती होडीला बांधली. पाहुण्यांनी पाणी काढायचं काम चालूच ठेवलं होतं. रस्सीचं एक टोक हातात धरून रहमान खाली उतरला. त्याने एक टोक होडीला बांधलं नि दुसरे टोक फांदीला बांधलं. रात्र चांगलीच झाली होती.

''काकानू, आता आपन आसा करूया-''

''काय बाबा करायचं? आम्ही कधी घरी पोचणार? रात्री इथेच राहायचं की काय? दुसरी एखादी होडी बघून देतोस काय?''

पाहुणा घाबरूनच गेलेला. मुलं रडायला लागली, त्यांची आई त्यांना 'उगी उगी' म्हणत होती.

''काकानू, आता ही होडी काय फुडं जावची नाय. आता तुमचा सामान इथेच उतरुया. दुसरी जानारी होडी दिसली तर मी हाकारा करतंय. तुमचा घर लांब असा, रात्री तिकडे जावकच नुको.''

''बाप रे ! मग आम्ही रहायचं कुठे? इथे? काय प्रसंग आला रे बाबा आमच्यावर? होडी पाण्यात घालतानाच बघायची नाय काय?'' बाई बोलत होत्या.

''तसा नाय बाईसायबांनो, चीर येकदमच पडलीहा, मी काय सांगतंय ते ऐकाल काय?''

''हां सांग !''

ह्या गावात माजी चांगली वळख हाय, रहमानने मग त्याच्या ओळखीच्या नावाने पुकारा घातला, ''अंतुकाका, रानडेऽऽ होऽऽऽ म्हारापुरल्याच्या बंदरात कोणाकतरी पाटवा व्हयऽऽ.. खंदील घ्येवन पाटवा होऽऽऽ.'' खूप मोठ्या आवाजातला कुकारा रानड्यांना ऐकू आला. त्या मालकांनी चार गड्यांना कंदील घेऊन खाली पाठवलं. त्यांनी सामान वर न्हेलं. रहमान त्या गावातल्या हायस्कूलमध्येच शिकत होता.

पाहुण्यांना घेऊन तो हेडगुरुजींकडे गेला, सरांना त्याने सगळी हकीकत सांगितली. सरांनी त्या कुटुंबाची राहण्याची, जेवणाची, झोपण्याची व्यवस्था त्यांच्या घरी केली.

पाहुणे म्हणाले, ''कोणाचे कोण तुम्ही ! आज आम्हाला तुमच्या घरी राहायला लागतंय, ह्याने होडी आधीच चेक करायला हवी होती.''

हेडसरांनी पाहुण्यांना समजावून सांगितलं, ''उलट रहमानच्या प्रसंगावधानामुळे आज तुम्ही वाचलात, जिवावरचा प्रसंग होता. तो रात्रीवर निभावला, नाहीतर फारच दुःख ओढवलं असतं, होडीला चीर पडली हा त्याचा दोष नाही, पण पुढे त्याने जे काही केलं त्याला तोड नाही. मोठ्या माणसालाही हे सगळं सुचलं नसतं. ११–१२ वर्षांचा मुलगा. त्याने संकटाला किती धीराने तोंड दिलं ! एखादा घाबरून गेला असता. तुम्ही निःसंकोचपणे आमच्याकडे रहा. आमच्या खेड्यातला पाहुणचार घ्या.''

दुसरे दिवशी रहमानच्या पराक्रमाची बातमी सर्वत्र पसरली. पहाटे उठून तो आपल्या घरी गेला. आई–बाबांनी त्याला जवळ घेतलं, आपल्या शूरवीर मुलाचा त्यांना किती अभिमान वाटला ! दुसऱ्याची होडी घेऊन सकाळी रहमानने पाहुण्यांना त्यांच्या घरी पोचवले.

शाळेतल्या नेहमी रागावणाऱ्या सरांनी रहमानची पाठ थोपटली. प्रार्थनेच्या वेळी हेडसरांनी रहमानच्या पराक्रमाची कहाणी मुलांना सांगितली. त्याचा सत्कार केला. ते म्हणाले, ''अशी शूर मुलं म्हणजे आमच्या शाळेचं भूषण आहे.'' गावात ठिकठिकाणी रहमानचा सत्कार झाला. गावकऱ्यांनी त्याला होडीसाठी पैसे दिले. वर्तमानपत्रात त्याच्या शौर्याची फोटोसह बातमी आली.

मुलं म्हणाली रहमान आम्ही तुला अभ्यास भरून काढायला मदत करू. रहमान शाळेचा लाडका झाला.

✦✦

# फोनाफोनी आणि उपद्‌व्याप

आमच्या घरात एकूण पाच माणसं. आजी, आजोबा गावाला असतात. इथे आई, बाबा, दादा, मी नि ताई. ताई म्हणजे माझी मावस बहीण. पुण्यातलं शिक्षण चांगलं म्हणून रिताताई आमच्याकडे आलीय.

आम्ही पाच माणसं; पण मोबाईल मात्र चारच ! म्हणजे सरळच आहे ना, मला मोबाईल नाही. मीही छान वापरला असता; पण लहान मुलांनी मोबाईल? नो ! घरचं फर्मानच !

मी आणि माझा प्रिय मित्र 'टिंक्या' एकाच इमारतीत राहतो. आमचा फ्लॅट दुसऱ्या मजल्यावर नि टिंक्याचा तिसऱ्या मजल्यावर आहे. आमची दोघांची फार म्हणजे फारच दोस्ती आहे. आम्ही एकाच वर्गात आहोत. आमचा नेहमीचा फोन बाबांनी काढून टाकलाय. सगळ्यांना मोबाईल आहेत. मग कशाला हवा तो फोन, नुसतं भाडं भरायला. म्हणून म्हणे तो फोन रद्द केला. माझा काहीच विचार नाही. मला फोनवर बोलावंसं वाटणार नाही का?

त्या दिवशी शाळा सुटल्यावर टिंक्या आणि मी बाजारात फिरत होतो. आमच्या शाळेला जाताना बाजार लागतोच. सहज दुकानं बघत हिंडत होतो. खेळण्यातला पण 'खरा' असा फोन दुकानात समोरच ठेवलेला. आम्ही पायरी चढून वर गेलो. टेलिफोन पाहिला. दुकानदार सरसावला माहिती सांगायला. तो म्हणाला, ''तुम्ही एकाच इमारतीत रहाता ना? कितव्या मजल्यावर?'' ''आम्ही एकाच इमारतीत दुसऱ्या नि तिसऱ्या मजल्यावर रहातो, आम्ही मित्र आहोत.'' मी रुबाबात सांगितलं.

''तुम्हाला हा फोन छान वापरता येईल. तुम्हाला दोघांना एकमेकांशी बोलता येईल. दोघांनी मिळून एक फोन घेऊन टाका.'' दुकानदार हुशार होता. फोन खपेल असं बोलत होता.

''पैसे किती पडतील?'' टिंक्याचा महत्त्वाचा प्रश्न. ''फार नाही. दोनशे रुपये फक्त ! आधी पैसे साठवा, मग घ्या.'' दुकानदाराने आमच्या मनात ठिणगी पेटवली.

आम्ही दोघांनी ठरवलं. एक फोन घ्यायचाच. आम्ही पैसे साठवायला लागलो. पाहुण्यांनी दिलेले. आईने शाळेत खाण्यासाठी दिलेले डब्यात टाकले. मधल्या सुट्टीत वगैरे काहीही खाल्लं नाही. आईस्क्रिम खाल्लं नाही. गोळ्या, पेरू सगळं बंद ! तोंडाला कुलूप ! आमचे पैसे आम्ही